क्रमांक : ४८

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**मंगळवार, दिनांक १८ जून, २०२४ / ज्येष्ठ २८, शके १९४६**

**महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२४ मधील तृतीय (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांचा सुधारित चक्रानुक्रम**

**संदर्भ : या सचिवालयाचे पत्रक भाग-दोन क्र.३१, दिनांक १८ एप्रिल, २०२४**

**या सचिवालयाच्या संदर्भाधीन पत्रक भाग-दोन मध्ये सुधारणा करुन खालील प्रमाणे सुधारित पत्रक भाग-दोन निर्गमित करण्यात येत आहे,**

४८. विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या शुक्रवार दिनांक १४ जून, २०२४ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार आगामी तृतीय (पावसाळी) अधिवेशन गुरुवार, दिनांक २७ जून, २०२४ रोजी विधानभवन, मुंबई येथे सुरु होणार आहे. त्यानुसार मा.मंत्री महोदयांना तारांकित प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी पुढील प्रमाणे सुधारित दिवस नेमून दिले आहेत.

तसेच पहिल्या आठवडयातील गुरुवार दिनांक २७ जून व शुक्रवार दिनांक २८ जून, २०२४ या दोन दिवसांचे तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट गुरुवार, दिनांक २० जून, २०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता व त्यापुढील आठवड्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट त्यानंतरच्या प्रत्येक सोमवारी सह सचिव / अवर सचिव / अवर सचिव (समिती) यांच्या दालनात घेण्यात येईल. याबाबतची माहिती पत्रक भाग दोनद्वारे स्वतंत्ररित्या मा.सदस्यांना कळविण्यात येईल. सदरहू बॅलटसाठी मा.सदस्यांना उपस्थित राहता येईल, **परंतु त्यांना प्रवास किंवा दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.**

**:: विवरणपत्र ::**

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | पुर्वीच्या उत्तराचा वार व दिनांक (३) | उत्तराचा सुधारित वार व दिनांक (४) |
|---|---|---|---|
| एक | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) मृद व जलसंधारण मंत्री<br>(३) गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री<br>(४) राज्य उत्पादन शुल्क मंत्री | सोमवार, दिनांक १० जून, २०२४<br>सोमवार, दिनांक २४ जून, २०२४ | सोमवार, दिनांक १ जुलै, २०२४<br>सोमवार, दिनांक ८ जुलै, २०२४ |
| दोन | मुख्यमंत्री | मंगळवार, दिनांक ११ जून, २०२४<br>मंगळवार, दिनांक १८ व २५ जून, २०२४<br>(एकत्रित करण्यात आले आहेत. ) | मंगळवार, दिनांक २ जुलै, २०२४<br>मंगळवार, दिनांक ९ जुलै, २०२४ |

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | पुर्वीच्या उत्तराचा वार व दिनांक (३) | उत्तराचा सुधारित वार व दिनांक (४) |
|---|---|---|---|
| तीन | (१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(२) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य मंत्री<br>(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री<br>(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(५) अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्री<br>(६) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री<br>(७) अन्न व औषध प्रशासन मंत्री | बुधवार, दिनांक १२ व १९ जून, २०२४<br>(एकत्रित करण्यात आले आहेत. )<br>बुधवार, दिनांक २६ जून, २०२४ | बुधवार, दिनांक ३ जुलै, २०२४<br>बुधवार, दिनांक १० जुलै, २०२४ |
| चार | (१) वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री<br>(२) ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री<br>(३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(४) कामगार मंत्री<br>(५) उद्योग मंत्री<br>(६) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(७) महिला व बालविकास मंत्री<br>(८) क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री<br>(९) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री | गुरुवार, दिनांक १३ जून, २०२४<br>गुरुवार, दिनांक २० जून, २०२४<br>गुरुवार, दिनांक २७ जून, २०२४ | शनिवार, दिनांक २९ जून, २०२४<br>गुरुवार, दिनांक ४ जुलै, २०२४<br>गुरुवार, दिनांक ११ जुलै, २०२४ |
| पाच | (१) सहकार मंत्री<br>(२) महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री<br>(३) वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री<br>(४) आदिवासी विकास मंत्री<br>(५) कृषी मंत्री<br>(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री<br>(७) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री | शुक्रवार, दिनांक १४ जून, २०२४<br>शुक्रवार, दिनांक २१ जून, २०२४<br>शुक्रवार, दिनांक २८ जून, २०२४ | शुक्रवार, दिनांक २८ जून, २०२४<br>शुक्रवार, दिनांक ५ जुलै, २०२४<br>शुक्रवार, दिनांक १२ जुलै, २०२४ |

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**विधान भवन,**
**मुंबई**
**दिनांक : १८ जून, २०२४**

**प्रति :**

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व मा.सदस्य.
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष यांना अग्रेषित.
(४) संगणक कक्ष व MKCL कक्ष.